● रविवार, दि ८ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४९ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282













युवा आदर्श

### मुर्ती कार ...

मंगलमूर्ती सुरेखमूर्ती
मुर्तीकार घडवितात
कला आविष्कार ते
मुर्तीमध्ये जडवितात
मुर्ती कार कलाकार
नाही त्यांना धर्मजात
कुणी शिकतो कष्टाने
कलाप्राप्त जन्मजात
मुर्तीमध्ये जीवत्व येई
जागृती होई अंतरात
कार्यरत असंख्य हात
साजरी छान नव रात
हिंदुदेवता आहे कशी
मुसलमान जाणतात
धर्म जात ना आडवी
जागृती ती आणतात
विहंगम दृश्य असले
दिसते सर्व उत्सवात
मुर्तीकार असो कुणी
कमी नाही उत्साहात
निमित्ते वाढे रोजगार
सुखाचेघास मिळतात
गणेश कृपा सर्वतोपरी
कैक संसार जुळतात

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# बाप्पा मोरयाच्या जयघोषात 'श्रीं'चे आगमन




**जालना । परतूर । मंठा । प्रतिनिधी** - गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरयाच्या जयघोषात शनिवारी (दि ७) रोजी जिल्हाभरात सार्वजनिक गणेश मंडळांसह घराघरात 'श्रीं'चे आगमन झाले. जिल्ह्यातील नेते मंडळींनी बाप्पाच्या आगमनाची जोरदार तयारी केलेली होती. माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या घरी सहपरिवार तांडव ढोलपथकाच्या दणदणाटात बाप्पाचे आगमन झाले. माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, भाजपाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या घरी तर शिवसेना (शिंदे गट) मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या संपर्क कार्यालयात मोठ्या थाटात बाप्पा विराजमान झाले.

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी गणेशभक्तांचा उत्साह प्रकर्षाने दिसून आला. ढोल, ताशे, डिजे, लेझीम, पारंपारिक वेषभुषेत जिल्ह्यातील जवळपास सर्वच रस्त्यांवर बाप्पाच्या मिरवणुकीने लक्ष वेधले होते. जालना शहरातील मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे आमदार कैलास गोरंट्याल यांच्या परिवाराच्या वतीने श्रींची स्थापना व पुजन करण्यात आले. प्रसंगी सौ. संगीता गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, प्रनोती गोरंट्याल यांची उपस्थिती होती. श्रीगणेशाची मूर्ती खरेदी करण्यासाठी तसेच दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या महालक्ष्मी सणाच्या पार्श्वभूमीवर विविध वस्तूच्या खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी झाली होती. गणेशोत्सवाच्या काळात विविध गणेश मंडळाकडून लोकजागृती, समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. जालना शहरात यंदा गणेश फेस्टीवल व श्री गणेश महासंघ यांच्यावतीने क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

### हे गणराया बळीराजाला सुखी समाधानी समृद्ध होऊ दे - आमदार बबनराव लोणीकर

गेल्या वर्षी ऐन पावसाळ्यात जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात भाग बदलत अनेक महसूल मंडळात पावसाचा वीस ते तीस दिवस खंड पडल्याने आणि गेल्या वर्षी अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. याही वर्षी अतिवृष्टीने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी बळीराजाच्या पाठीशी राज्य सरकार व केंद्र सरकार खंबीरपणे नक्कीच आहे. पण हे गणराया बळीराजावर आलेले ही संकट टळू दे. बळीराजाला सुखी समाधानी समृद्ध होऊ दे धन धान्य पिकू दे. गणपती बाप्पा नवसाला पावणारा देव आहे. गणपती बाप्पा च्या कृपेनें नक्कीच महाराष्ट्र राज्य भरात सुख शांती आणी समृद्धी नांदेल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते श्री भक्ती निवास यशवंत नगर जालना येथील निवासस्थानी आज गणरायाचे आगमन झाले याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीयांना एकत्र करून स्वातंत्र्याची रणनीती बनवण्यासाठी बाळ गंगाधर टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला होता. आज संपूर्ण भारतात हा सण अगदी थाटामाटात साजरा केला जातो. आज आमच्या निवास स्थानी श्री गणरायाचे आगमन झाले असेल आम्ही गणरायाची सहकुटुंब भक्ती भावे पूजा प्रार्थना केली असून देशभरातील तमाम गणेश भक्तांना गणेश उत्सवाच्या शुभेच्छा आ. लोणीकर यांनी दिल्या

### मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ

जालना शहरातील मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींचे स्थापना पूजन व महाआरती आमदार कैलास गोरंट्यालसह पत्नी सौ संगीता गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, प्रनोती गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आली त्यावेळी त्यांचा सत्कार मंडळ अध्यक्ष राजेंद्र आबड यांचे हस्ते करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे रोटरी क्लब ऑफ जालना, मेंन अध्यक्ष दीपक बगड़िया, सचिव रवि भक्कड़, लायंस क्लब ऑफ जालना मेन अध्यक्ष सौ जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, उपाध्यक्ष राहुल तालुका, सचिव अलकेश अग्रवाल, कोषाध्यक्ष अनुराग बंदुकवाला, जितेश तालुका, ॲड. दर्षित आबड, संजय तालुका, संतोष भारुका, डॉ अशहद पटेल, कृष्णा देविदान, आकाश तालुका, मयूर साहूजी, आनंद श्रीमाली, दीप आबड, जीत आबड, विशाल बनवट, निखिल आबड आदींची उपस्थिती होती.

### मंठा शिवसेना तालुका संपर्क कार्यालयात बाप्पांची विधिवत पुजा

श्री गणेश चतुर्थीच्या औचित्याने उत्साहापूर्ण वातावरणात शिवसेना संपर्क कार्यालय मंठा येथे लाडक्या बाप्पाचं विधिवत पूजेने आणि पारंपरिक पद्धतीने आगमन झाले. बाप्पांची विधिवत पूजा शिवसेना नेते बाजार समिती संचालक प्रल्हादराव बोराडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित योगेश गणगे, दिलीप हिवाळे, राम वरकड, दीपक गायकवाड, दत्तात्रय बोराडे, विजय चव्हाण, नितीन मोरे, पांडुरंग बोराडे, माऊली वायाळ, डॉ भताने, डॉ सरकटे, गजानन दळवे, लिंबाजी बोराडे, संभाजी आवचार, मोगल दाजी, सुनील गुंड व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## मेलडी क्वीन आशाताई

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९१ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९१ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. मागील वर्षी आशा भोसले यांना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले तेंव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**


श्री पी.एस. डी.टी.पी.
ॲण्ड मल्टीसर्व्हीसेस्
कामासाठी
मुले पाहिजे.
ऑनलाईन कामे, झेरॉक्स, डि.टी.पी.
यापैकी कुठलेही काम येत असल्यास प्राधान्य
तसेच शिकाऊ उमेदवार.
पत्ता :– मामा पेढेवाल्याच्या बाजुला,
भांदगे वकील समोर, शनी मंदिरजवळ, जुना जालना
मो.नं.9309588300


# शेतकरी स्वातंत्र्याचा जाहीरनामा!

'शेतकरीविरोधी कायदे' ही पुस्तिका शेतकऱ्यांच्या तमाम मुलामुलींनी वाचणे अत्यंत गरजेचे आहे. कारण आपला जन्म या मातीत झालेला आहे. या मातीत आपण वाढलो आहोत. शेतकऱ्याच्या वेदनांची आपल्याला ओळख आहे. या मातीचे आपण देणे देखील लागतो. ही जबाबदारी आपण विसरत चालेलो आहोत. ही पुस्तिका त्याचे भान देते.

दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. महाराष्ट्रात उच्चांक झाला आहे. लाखो शेतकरी आत्महत्या करीत असताना सुद्धा या त्याबद्दल कोणतीही जबाबदार व्यक्ती, राजकीय पुढारी बोलताना दिसत नाही. शेतकरी आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती त्याना वाटत नाही. शेतकऱ्याचा मुलगा-मुलगी म्हणून आपले हे नैतिक काम आहे की, आपण आपल्या बापाच्या प्रश्नांबद्दल बोलले पाहिजे. आवाज उठवला पाहिजे. मला असे वाटते की, प्रत्येक शेतकऱ्याच्या मुलांने ही पुस्तिका वाचलीच पाहिजे, समजून घेतली पाहिजे आणि शेतकरी आत्महत्या, शेतकरी दुरावस्था, शेतकरी आर्थिक विवंचना आणि शेतकरी स्वातंत्र्य या बाबत समजून घेतले पाहिजे. यासाठी ही पुस्तिका एक मार्गदर्शक म्हणून काम करेल असा मला विश्वास वाटतो. शेतकरी आत्महत्या थांबाव्यात, शेतीची लुटालूट थांबावी, रक्तपात थांबावा, त्यासाठी कोणते उपाय आहेत? हे जाणून घेण्याची उत्सुकता असणार्या लोकाना ही पुस्तिका उपयुक्त ठरेल. ही पुस्तिका शेतकरी प्रश्नाचे अचूक निदान करून देते, योग्य मार्गदर्शन करू करते.

या लहानशा पुस्तिकेने शेतकऱ्यांच्या मूळ समस्येला हात घातला आहे. शेतकऱ्याचे जीवन-मरणाचे प्रश्न यात सांगितले आहेत. आजपर्यंत अनेक विद्वानांनी वेगवेगळे उपाय सुचविले आहेत. ते सगळे उपाय फसले आहेत. या पुस्तिकेत कालबाह्य व निरर्थक उपाय बाजूला ठेवून शेतकऱ्यांची दुरावस्था आणि आर्थिक हतबलतेची योग्य कारणमिमांसा केली आहे. शेतकरी आत्महत्या व यांच्या पाठीमागची नेमकी कारणे कोणती, हे सांगण्याचे काम या लहानशा पुस्तिकेने अत्यंत स्पष्टपणे केलेले आहे. शेतकऱ्यांचे मरण त्याला कायदेच कारण असे या पुस्तिकेने सिद्ध केलेले आहे. शेतकऱ्यांच्या या दुरावस्थेला महत्त्वाचे तीन प्रमुख कायदे कारणीभूत आहेत. ते कायदे या पुस्तिकेत सविस्तर सांगितले आहेत. अगदी उदाहरणासह. कोणताही माणूस सहजपणे या गोष्टी समजून घेऊ शकतो की, कशा प्रकारे शेतकरीविरोधी नरभक्षी कायदे जबाबदार आहेत. १) कमाल शेतजमीन धारणा कायदा (सीलिंग कायदा) २) आवश्यक वस्तू कायदा




आणि ३) जमीन अधिग्रहण कायदा या तीन कायद्या द्वारे शेतीच्या लुटीची एक दीर्घ काल चालू शकेल अशी व्यवस्था निर्माण केलेली आहे. या तीन कायद्यांचा एकत्रित परिणाम आपणाला अभ्यासावा लागणार आहे.

या पुस्तिकेने शेतकऱ्यांच्या मूळ समस्येवर उपाय सांगितलेला आहे. तो म्हणजे शेतकरी विरोधी नरभक्षी कायदे रद्द करणे आणि शेतकरी इतर उद्योजकांप्रमाणे काम करू शकेल अशी परिस्थिती निर्माण करणे. शेतकऱ्यांचे हात-पाय ज्या कायद्यानी बांधले गेलेले आहेत, ते सुटणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार लिहिलेले आहेत. ते शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत. शेतकऱ्यांना सुद्धा इतर नागरिकांप्रमाणे त्यांचे स्वातंत्र्य त्यांना उपभोगता आले पाहिजेत, असे या पुस्तिकेचे सूत्र आहे.

या पुस्तिकेत आपणाला भेडसावणारे ३७ प्रश्न आहेत आणि या प्रश्नांची उत्तरे अत्यंत साध्या-सोप्या व सर्वसामान्य माणसाला समजेल अशा पद्धतीने दिलेली आहेत. ही प्रश्नोत्तर पद्धत मला अतिशय योग्य वाटते. यामुळे वाचकाला नेमक्या प्रश्नाचे नेमके उत्तर मिळते.

या पुस्तिकेत कायदा काय आहे? कायदा काय करू शकतो? व त्याचे दुष्परिणाम कोणते झाले? त्यावर कोणता उपाय आहे? याबद्दल अत्यंत स्पष्टपणे माहिती दिली आहे. यात तीनही कायद्यांची पार्श्वभूमी सांगितली आहे, त्यामुळे कोणत्या परिस्थितीत हा कायदा आला, हे कळू शकते. वेळोवेळी झालेल्या घटनादुरुस्त्या कशा झाल्या. त्यांचा शेतकऱ्यांशी कसा संबंध आहे हेही याच पुस्तिकेत स्पष्ट केले आहे. कोणता कायदा कशा पद्धतीने शेतीसाठी अडथळा निर्माण करतो, हे सांगून कायद्यांच्या दुष्परिणामामुळे आज शेतकऱ्यांचे कसे हाल झाले आहेत, त्याचा देशावर काय परिणाम झाला आहे, आपल्या अर्थव्यवस्थेला कसा धोका झाला, रोजगाराच्या संधी कशा मारल्या गेल्या, याची लेखक चर्चा करतात.

या पुस्तिकेच्या शेवटच्या भागात किसानपुत्र आंदोलनाची भूमिका व कार्यपद्धती याच्याबद्दल माहिती सांगितलेली आहे. किसानपुत्र आंदोलन ही संघटना नसून आंदोलन आहे. शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यासाठी काय करावे लागेल हेही स्पष्ट केले आहे.

या पुस्तिकेला मी 'शेतकरी स्वातंत्र्याचा जाहीरनामा' असे म्हणतो आणि जगभरामध्ये मानव मुक्तीसाठी अनेक लोकांनी काम केलेले आहे, त्या कामाला पूरक होईल, अशी ही पुस्तिका आहे.

या पुस्तिकेचे लेखक आहेत किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते माननीय अमर हबीब सर. त्यांनी आपली संपूर्ण हयात शेतकरी स्वातंत्र्यासाठी लढण्यामध्ये लावली आहे. जयप्रकाश नारायण, शरद जोशी अशा स्वतंत्रतावादी महान व्यक्तीं सोबत त्यांनी काम केले आहे. ही व्यक्ती शेतकऱ्यांचा प्रश्न गरिबीचा नसून गुलामीचा आहे, असे ठामपणे सांगत आली आहे. शेतकरी आणि स्त्री हे सर्जक आहेत, त्यांना फक्त स्वातंत्र्य हवे आहे. वर्ग-संघर्ष खोटा, तसेच वर्ण-संघर्षही खोटा आहे, खरा संघर्ष सर्जकांच्या स्वातंत्र्याचा आहे, अशी त्यांची वैचारिक भूमिका आहे. ते पत्रकार व लेखक असल्यामुळे अत्यंत समर्पक लिहिले आहे. अनेक चळवळीतून तावून सुलाखून निघाल्यामुळे ते हे पुस्तक समर्थपणे लिहू शकले आहेत. शेतकर्यांच्या मुला मुलींनी तसेच अभ्यासकांनी व कार्यकर्त्यांनी ही च्तेखानी पुस्तिका जरूर वाचली पाहिजे.

८४११९०९९०९ या मोबाईल क्रमांकावर आपला पत्ता पाठवला तरी तुमच्या व्हाट्सएप वर ही पुस्तिका पीडीएफ स्वरूपात मोफत पाठवली जाते. छापील पुस्तक घरपोच हवी असेल तर पुस्तकाची किंमत ६०रु व टपाल खर्च २०रु असे एकूण ८०रु ९४२२९३१९८६ या क्रमांकावर पाठवावे. याच क्रमांकावर तुमचा पिनकोडसह पूर्ण पत्ता पाठवावा. रजिस्टर्ड पोस्टाने पुस्तक पाठवले जाते. या पुस्तकाच्या आतापर्यंत पाच आवृत्या निघाल्या आहेत. हिंदी व इंग्रजीतही पुस्तक उपलब्ध आहे.



**पुस्तकाचे नाव- शेतकरीविरोधी कायदे**
**लेखक- अमर हबीब**
**प्रकाशक- परिसर प्रकाशन, आंबाजोगाई- ४३१५१७**

**नितीन राठोड, पुणे**
**८३२९२ ४८०३९**


# पुरुषांना व्रत आचारण प्रणालींची ओळख!

ऋषी पंचमी हे हिंदूंच्या चालीरीतींप्रमाणे,भाद्रपद शुद्ध पंचमीला स्त्रियांनी करावयाचे एक व्रत आहे. या दिवशी स्त्रिया ऋषींची मनोभावे व षोडशोपचारे पूजा करतात. यावरून या दिवसाला ऋषिपंचमी हे नाव मिळाले. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख वाचा...

सन १८७१-७२ची हिंदू दिनदर्शिकाप्रमाणे कश्यप, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वसिष्ठ आणि अत्रि या सात ऋषींची प्रत्येकी एक आणि वसिष्ठांची पत्नी अरुंधतीची एक अशा एकूण आठ सुपाऱ्या मांडून ही पूजा सिद्ध केली जाते. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र पुलस्त्य, क्रतु, मरीचि, अत्रि आणि वसिष्ठ या ऋषींचे पूजनही या दिवशी केले जाते. या दिवशी बैलाच्या कष्टाचे कोणतेही अन्न खाल्ले जात नाही. वर्षातून किमान एक दिवस तरी स्वतःच्याच कष्टाचे अन्न खावे, हा यामागचा संकेत वा संदेश आहे. अशा रितीने स्वकष्टार्जित या शब्दाला ऋषींनी प्रतिष्ठा दिलेली आहे. आपल्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी ऋषींनी सांगितलेल्या ज्ञान सिद्धान्ताचे वाचन, चिंतन, मनन पुढच्या पिढीने करत राहावे, याची आठवण देण्यासाठी हे व्रत आहे असे मानले जाते. गृहस्थाश्रमी पुरुषांच्या बाबतीत या व्रताची मुख्य योजना मुख्यतः आचार प्रणालींची ओळख व्हावी व गृहस्थाश्रम हा त्यांच्याप्रमाणेच आचारसंपन्न व्हावा या हेतूने असतो. स्त्रियांनी रजोनिवृत्तीनंतर हे व्रत अशा प्रकारे केल्यास त्यांच्याकडून पूर्वी रजोदर्शन काळात घडलेल्या स्पर्शात्मक दोषांचे मानसिक पातळीवर निरसन होऊ शकते, असे मानले जाते. ज्या विद्यार्थ्यांना श्रावणी- वेदाध्ययन करणाऱ्या वर्गासाठी विहित व्रत संस्काराचा लाभ होत नाही, अशा सर्ववर्णीय स्त्री पुरुषांनी त्यांच्या नित्य कर्मातील त्रुटी व स्खलन यांच्या परिहारासाठी ऋषिपंचमी हे व्रत करावे, असे सांगितले आहे.

व्रताचार- कोणत्याही व्रताचा काल व आचार निर्धारित होताना प्रामुख्याने भौगोलिक वातावरणाचा विचार केलेला असतो. त्यानुसार चातुर्मास काळात येणाऱ्या या ऋषी पंचमी व्रतामध्ये ऋषी पूजनाखेरीज आघाड्याच्या काष्ठाने दंतधावन, पंचगव्य प्राशन, सुवासिनींना हरिद्रास्नान, भस्मस्नान, गोमय स्नान, मृत्तिकास्नान, महासंकलपयुक्त तीर्थस्नान, अर्घ्यदान, अशा अनेक महत्त्वाच्या विधींचा अंतर्भाव केलेला आहे. ऋषिपंचमीच्या दिवशी विशिष्ट व्रताहार आणि ऋषी स्मरण- सप्तर्षींची पूजा या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असून धर्मशास्त्रकारांना अभिप्रेत असणारा व्रताहार हा नेहमीच्या उपवासाहून पूर्णतः भिन्न आहे. कारण एरवीच्या उपासात रसाहार, फलाहार किंवा हविष्यान्न विहित असते. परंतु ऋषी पंचमीच्या दिवशी व्रताहारामध्ये केवळ मानवी कष्टातून उत्पन्न झालेले अर्थात, न नांगरलेल्या जमिनीमधील पदार्थाचे सेवन करणे अभिप्रेत असते. तसेच या व्रतातील विविध स्नाने सांप्रतकाली लोकप्रिय असणाऱ्या निसर्ग उपचार प्रणाली मध्ये आचरली जातात व त्यापासून होणारे लाभही दिसून येतात.

प्रांतनिहाय व्रताचार- महाराष्ट्रात ग्रामीण भागात विशेषतः कोकण भागात हे व्रत महिला करतात त्याचप्रमाणे नेपाळमधील महिलाही हे व्रत करतात.



ऋषीची भाजी- या दिवशी एक विशिष्ट प्रकारची भाजी केली जाते. अळूची पाने, सुरण, वाल, लाल भोपळा, मटार, भेंडी, कोवळी माठ-भाजी या भाज्या वापरून ही भाजी तयार केली जाते. यांतली कोणतीही भाजी बैलाच्या श्रमाची नसते.

ऋषी पंचमी हा सण भाद्रपद शुक्ल पक्ष पंचमी तिथीला साजरा केला जातो आणि या दिवशी पाळल्या जाणाऱ्या व्रताला ऋषी पंचमी व्रत म्हणतात. ब्रह्मपुराणानुसार चारही वर्णातील महिलांनी या दिवशी हे व्रत पाळावे असे सांगण्यात आले आहे. हे व्रत रजत अवस्थेत शरीराने केलेल्या स्पर्शाचे व इतर पापांचे प्रायश्चित्त म्हणून केले जाते. मासिक धर्माच्या वेळी नकळत पूजा किंवा धार्मिक कार्यात सहभाग घेतला असल्यास या व्रताने त्यांची पापे नष्ट होतात, असे आपल्या पौराणिक ऋषी मुनी वशिष्ठ, कश्यप, विश्वामित्र, अत्री, जमदग्नी, गौतम आणि भारद्वाज या सात ऋषींच्या पूजेसाठी हा दिवस विशेष मानला जातो. या दिवशी भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी आणि वशिष्ठ, कश्यप आणि अत्री या सप्तर्षी- सात ऋषींची आणि अरुंधती देवीची पूजा करावी. त्यानंतर या ऋषींची विधिवत पूजा करावी. या दिवशी लोक सहसा दही आणि देव भात खातात, मीठ वापरण्यास मनाई आहे. या व्रतामध्ये नांगरलेल्या शेतातून निर्माण झालेल्या सर्व गोष्टी वर्ज्य मानल्या जातात, त्यामुळे नांगरलेल्या शेतातील भाज्या व फळांचा या दिवशी अन्नात वापर होत नाही.

ऋषीपंचमीची पौराणिक कथा- पौराणिक कथेनुसार उत्तक नावाचा ब्राह्मण आपल्या पत्नीसह विदर्भात राहत होता. त्यांना दोन मुले होती. एक मुलगा आणि एक मुलगी. ब्राह्मणाने योग्य वर पाहून आपल्या मुलीचे लग्न त्याच्याशी लावले. पण, काही दिवसांनी त्याचा अकाली मृत्यू झाला. यानंतर त्याची निराधार पत्नी आपल्या माहेरी परतली. एके दिवशी मुलगी एकटीच झोपली होती, तेव्हा तिच्या आईने मुलीच्या अंगावर जंत वाढल्याचे पाहिले. हे पाहून ती घाबरली आणि तिने तात्काळ उत्तक यांना माहिती दिली. उत्तक ब्राह्मणाने ध्यान केल्यावर सांगितले की, तिच्या मागील जन्मी ती एका ब्राह्मणाची मुलगी होती. पण, मासिक पाळीदरम्यान तिच्याकडून मोठी चूक झाली होती. मासिक पाळीच्या अवस्थेत तिने भांड्यांना हात लावला होता आणि ऋषीपंचमीचे व्रतही पाळले नव्हते. त्यामुळेच तिची ही अवस्था झाली. यानंतर वडिलांच्या सांगण्यावरून मुलीने ऋषीपंचमीचे व्रत केले आणि ती बरी झाली. ( ही माहिती व कथा उपलबध स्त्रोतावरून देण्यात आलेली आहे. याच्या तथ्यांबद्दल आपण कुठलाही दावा करीत नाही, तसेच अंधश्रद्धेला दुजोरा सुद्धा देत नाही, हे मी प्रामाणिकपणे जाहीर करतो. ऋषिपंचमी व्रताच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# बदनापुरात जनावरे चोरींच्या घटनेत वाढ

## ५ शेळ्या ४६ हजार किमतीच्या चोरट्यांनी पळविल्या

**बदनापूर । प्रतिनिधी -** येथील रेल्वे स्टेशन रोड वरील इनामदार कॉलोनी मधील शेख नजीर इनामदार यांच्या राहत्या घराच्या टपरी मधून रात्री २ ते ३ वाजेच्या सुमारास तीन मोठ्या आणि दोन लहान शेळ्या अज्ञात चोरट्यांनी पीक अप गाडीतून चोरून नेल्याची घटना घडली आहे . ह्या पाच शेळ्या अंदाजे ४६ हजाराच्या आहे हे चोरटे सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून हे नेहमी दर दोन तीन महिन्यात बदनापूर शहरातून शेळ्या पीक अप गाडीतून चोरून नेतात मात्र या चोरट्यांचा बदनापूर पोलिसांनी अद्यापही शोध लावला नसल्याने या चोरट्यांची हिम्मत दिससोंदीवस वाढत चालली आहे यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही बदनापूर शहरात जनावरे चोरनारे असून संशयाच्या नजरेने पोलिसांनी अद्यापही एकही चोरट्याला पकडले नाही हे विशेष....

या बाबत बदनापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून भारतीय न्याय संहिता बी एन एस २०२३ नुसार कलम ३०३ /२ प्रमाणे अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस जमादार बाबासाहेब जऱ्हाड करीत असल्याची माहिती ठाणे अमलदार वेलदोडे, आशिष दासर यांनी सांगितले.

# राष्ट्रवादीतील कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) जालन्यात खिंडार पडले असून अनेक पदाधिकाऱ्यांनी आ. कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मागील काही महिन्यांमध्ये काँग्रेस पक्षात मोठया प्रमाणावर इनकमिंग सुरू झाले आहे. आ.कैलास गोरंटयाल यांच्याकडे असलेली विकासाची दृष्टी, जायकवाडी - जालना ही महत्त्वाकांक्षी पाणी पुरवठा योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यासह शहर व ग्रामीण भागात केलेली विकासाची कामे नजरेत भरण्यासारखी असून शब्दाला जगणारा नेता अशी आ. कैलास गोरंटयाल यांची ख्याती असल्याने जालना विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शहर जिल्हा उपाध्यक्ष शेख अजीम, जिल्हा सचिव शेख जहिर यांच्यासह अनेकांनी त्यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. पक्षात नव्याने दाखल होणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल अशी ग्वाही आ. गोरंटयाल यांनी यावेळी दिली. या प्रवेश सोहळ्यास युवा नेते अक्षय गोरंटयाल, राम सावंत, राजेश पवार, शेख जब्बार, शेख लतिफ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी - आ.कैलास गोरंटयाल

## मोतीगव्हाण येथे भेट देऊन केली नुकसानीची पाहणी शेतकऱ्यांशी साधला संवाद

**जालना । प्रतिनिधी -** अतिवृष्टीमुळे पिकं मोठया प्रमाणावर आडवी झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. पिकांच्या झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी आ.कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे विशेषतः सोयाबीन, कापूस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जालना विधानसभा मतदार संघाचे आमदार कैलास गोरंटयाल यांनी आज दि. ७ सप्टेंबर शनिवार रोजी जालना तालुक्यातील मोतीगव्हाण येथे भेट देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष जात पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतात आजही गुडघाभर पाणी साचलेले असल्याने सोयाबीन आणि कापसाची पिके धोक्यात आली असल्याचे दिसून आले. या झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्यात यावी अशी मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

पिकांच्या नुकसानी शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले असून अनेक गोरगरिबांच्या घरांचीही पडझड झाली आहे. या नुकसानीचे देखील पंचनामे करून त्यांनाही आर्थिक भरपाई द्यावी अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना पिकांच्या आणि जमिनीच्या झालेल्या नुकसानीचे तसेच घरांच्या पडझडी झालेल्या



गरीब कुटुंबांना भरपाई मिळावी यासाठी आपण शासनस्तरावर देखील प्रयत्न करणार असल्याचे आ.गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह घरांची पडझड झालेल्या कुटुंबांना भेट देऊन आ. कैलास गोरंटयाल यांनी त्यांच्याशी थेट संवाद साधत भरपाई मिळवून देण्याची ग्वाही दिली. यावेळी जालन्याच्या तहसिलदार श्रीमती छाया पवार, राम सावंत, राजेश पवार, सोपान तिरुखे, दत्ता पाटील घुले यांच्यासह गावातील फकीरबा मोहिते, दिलीपराव मोहिते, भगवानराव मोहिते आणि ग्रामस्थांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# उर्दू माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळातील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा!

## राज्य आणि जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे आवाहन!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** प्रेषित हजरत मोहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त म्हणजेच ईद मिलादुन्नबी निमित्त हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनतर्फे दरवर्षी प्रमाणे सलग ११व्या वर्षी देखील उर्दू माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा ठेवण्यात आलेली आहे.यात फक्त उर्दू शिक्षक-शिक्षिका सहभाग घेऊ शकतात. यात विजेत्या शिक्षक-शिक्षिकांना रोख रकमेच्या स्वरूपातील बक्षिस, प्रमाणपत्र तसेच शानदार स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येईल. उर्दू माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शिक्षकांना निबंध स्पर्धेतील खालील विषयावरच निबंध लिहायचा आहे...

विषय-

**सिरत मुस्तफा और हमारी बेटियां**

या विषयांवरच १000 ते १२०० शब्दात (४ ते ५ पेज )लिहून आपला नाव, शाळेचा नाव लिहून या पत्त्यावर पाठवायचं आहे. विनस फूट वेअर, शहीद भगतसिंग चौक, मेन रोड, सिल्लोड पिन कोड ४३१११२.

टीप- निबंध हे लिहून पोस्टानेच पाठवायचे आहेत. आपले निबंध बंद पाकिटात पोस्टाने २१ सप्टेंबर (शनिवार) २०२४च्या आत पोहचतील असे पाठवावे. याची सर्वानी नोंद घ्यावी. तसेच हँड टू हँड प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत फक्त पोस्टाने आलेले निबंधच स्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाणार आहेत...

महाराष्ट्र राज्यातील व औरंगाबाद जिल्ह्यातील मराठी माध्यम आणि उर्दू माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शिक्षक बंधू-भगिनिंसाठी दर वर्षी प्रमाणे सलग ११व्या वर्षी ही हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनतर्फे राज्य स्तरीय व जिल्हास्तरीय मराठी माध्यम आणि उर्दू माध्यमांच्या सर्व शिक्षक-शिक्षकांसाठी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आपले आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी केली आहे. राज्य स्तरावर मराठी माध्यमातुन ३ आदर्श शिक्षक पुरस्कार, उर्दू माध्यमातून ३ राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच जिल्हास्तरीय मराठी मध्ये मनपा-१ , खाजगी-१ , जिल्हा परिषद-१ असे ३ आणि उर्दू माध्यम मध्ये जिल्हा परिषद-१ , खाजगी-१ , मनपातुन एक एक शिक्षक तसेच मराठी माध्यमातून १ चित्रकला शिक्षक आणि उर्दू माध्यमातून चित्रकला शिक्षक तसेच मराठी माध्यमातून १ क्रीडा शिक्षक व उर्दू माध्यमातून १ क्रीडा शिक्षक असे एकूण १६ शिक्षक-शिक्षिकांची आदर्श शिक्षक पुरुस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे, तरी महाराष्ट्र राज्यातील व औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व शिक्षक-शिक्षिकांनी आपले प्रस्ताव २१ सप्टेंबर (शनिवार) २०२४ पर्यंत पाठवावे. सर्व शिक्षक-शिक्षिकांनी काही अडचण किंवा शंका असल्यास तर हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर ९६५७५२४५४५ यांच्याशी संपर्क साधून आपला आपला प्रस्ताव सादर करावे असे आवाहन हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन तर्फे करण्यात आले आहे.

# वखारी येथे विविध विकासकामांचे भास्कर दानवे यांच्या हस्ते उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** मौजे वखारी ता. जि. जालना येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर झालेल्या विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण सोहळा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या हस्ते पार पडला.

गावामध्ये पिण्याच्या पाण्याच्या समस्या सोडवण्यासाठी जलजीवन मिशन सारख्या योजने अंतर्गत गावात पाणीपुरवठ्यासाठी १ कोटी ४५ लक्ष्य रुपयांचा निधी रावसाहेब दानवे यांनी मंजुर केला होता तसेच खासदार निधी अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्र सभागृह बांधकामासाठी १५ लक्ष्य रूपये, विठ्ठल-रुख्मिणी व श्रीराम मंदिरासमोर सभामंडप बांधकामासाठी प्रत्येकी १० लक्ष्य रूपये व वखारी तांडा येथे सि.सि. रोड व भूमिगत नालीच्या बांधकामासाठी ५ लक्ष्य रूपये निधी मंजूर करण्यात आला होता, यावेळी या पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे गावकऱ्यांच्या मागणीनुसार श्री सदानंद महाराज मंदिरासमोर सभामंडप बांधकामासाठी १० लक्ष्य रूपये व दलितवस्तीसाठी स्मशानभूमी शेड चे बांधकामासाठी खासदार निधी अंतर्गत ८ लक्ष्य रूपये निधी मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आला आहे, यावेळी या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी बोलताना, गावात अजून विकासकामे निरंतर होतच राहतील, वखारी गावाला कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही. निवडणुकीच्या काळात काही खोट्या गोष्टी जनसमान्यात पसरविण्यात आल्या होत्या या पुढे अश्या गोष्टीना भुरळ न पडता गेली २५ वर्ष तुम्ही जी साथ दिली असेच यापुढेही राहूद्य, असे प्रतिपादन मा. भास्करआबा दानवे यांनी केले.

झालेल्या विविध विकास कामांसाठी ग्रामस्थांनी त्याच प्रमाणे गावातील अनेक महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ मिळाल्याबद्दल गावकऱ्यांनी मा. भास्करआबा दानवे यांचे आभार मानले. तसेच गावातील रहिवासी नारायण काळे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

याप्रसंगी याप्रसंगी जिल्हा युवा मोर्चाचे जिल्हाअध्यक्ष भागवतबापू बावणे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष कैलास उबाळे, डउ मोर्चा जिल्हाअध्यक्ष अनिल सरकाटे, कपिल दहेकर, सुधाकर खरात, निवृत्ती लंके, नागेश अंभोरे, काकासाहेब घुले, गजानन घुले, गोवर्धन कोल्हे, विनायक राठोड, राजू उगले, ज्ञानेश्वर राठोड, पुजाराम भूतेकर, सुभाषराव भुतेकर, दीपक पडूळ, गौतम सरकाटे, संदीप बोर्डे, रमेश काळे, उत्तमराव घुले, रघुनाथ घुले, श्रीराम काळे, विक्रम खैरे, नरसिंग जाधव, सिद्धार्थ बोरुडे, रघुनाथ महाराज देशपांडे, भगवान सर खैरे, भरत घुले, गंगाधर क्षीरसागर, सुरेश शिंदे, देशपांडे महाराज यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्राध्यापक - शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालयांमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या शिक्षक दिनानिमित्त संस्थेच्या वतीने सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांचा संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षक दिन शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आल्यामुळे सर्व शिक्षक भावनिक झाले. याप्रसंगी संस्थेचे शेख जमीर सर यांनी शिक्षकांशी संवाद साधला. शेख जमीर सर यांनी सांगितले शिक्षकाचे ध्येय हे विद्यार्थी घडवणे असून समाजातील लोकांमध्ये प्रतिमा चांगली निर्माण करणे हा उद्देश असतो त्यामुळे शिक्षकांची भूमिका आणि आजच्या काळातील आव्हान यामध्ये शिक्षकच हा महत्त्वाचा दुवा असून शिक्षकांच्या हातून अनेक सामाजिक कार्य घडवून येऊ शकतात.याप्रसंगी उपस्थित त्यामध्ये संस्थेच्या वतीने ज्येष्ठ संचालक मधुकरराव निकम, माजी सचिव तथा संचालक प्रेमसुख काबरा,ज्येष्ठ संचालक विश्वनाथराव सांगोळे, तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, यांची आवर्जून उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने सर्व शिक्षकांची प्राध्यापकांशी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संवाद साधण्यात आला व त्यांना शिक्षक दिनाच्या निमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. प्राचार्य नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाब सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराने, सखाराम बोरकर,रमेश इंगळे, विष्णू जाधव, संजीव कुलकर्णी गणेश सावसक्के, प्राध्यापक सुनील बनसोडे प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक केजी जाधव, प्राध्यापक रामदास भांगे, प्रा गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, राजेंद्र जगताप कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, रवींद्र मोरे, संजय कुलकर्णी, समाधान कांबळे, वासुदेव क्षीरसागर, दत्ता उखर्डे, भिवसन ससाने, राजू डोमळे, श्रीमती पाटील मॅडम, श्रीमती आवटी मॅडम, श्रीमती शेख मॅडम, श्रीमती भिलावेकर मॅडम, श्रीमती कळंबे मॅडम, श्रीमती लंबे मॅडम, नागोराव देशमुख, दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख, तसेच संस्थेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमातील मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक तसेच उपप्राचार्य झालेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

# अशोक गुळवे राजे शिवाजी गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील राजे शिवाजी गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी अशोक गुळवे, उपाध्यक्षपदी बालाजी इंगळे, सचिवपदी संजय डोईफोडे आणि कोषाध्यक्षपदी शिवाजी कव्हळे यांची निवड करण्यात आली.

मंडळाचे संस्थापक रामधन कळंबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी पांडुरंग बोरसे, सुधीर भोपळे, संदिप जाधव, काशिनाथ उखर्डे, अभिषेक पिंपळे, संजय बोडखे, शंतनु सपाटे, शुभम कल्याणकर, रोहन शिल्लारकर, दादाराव राऊत, मंगेश वाणी, रविराज वाघमोडे यांच्यासह मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# वृक्षारोपण करून केला वाढदिवस साजरा




**परतूर । प्रतिनिधी -** पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे.एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया वृक्ष मोठा होई पर्यंत त्या वृक्षाचे संगोपन करुया तरच आपल जिवन अमुल्य प्रदुषण मुक्त होईल व शुध्द हवा मिळु शकेल. आक्सीजन मोठ्या प्रमाणात मिळेल. वृक्षारोपण वृक्षसंवर्धन एक वृक्ष आरोग्य स्वस्थ चला आज पासून संकल्प करुया एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया. ही संकल्पना घेऊन श्रीराम फाउंडेशन च्या वतीने भगवान पाटोळे सामाजिक कार्यकर्ते तथा शालेय समिती सदस्य यांच्या वाढदिवसानिमित्त रोपटे लावून वाढदिवस साजरा केला.जन्मदिनाच्या दिनाच्या सर्व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, क्षेत्रातील, मित्र परिवारांनी शुभेच्छा दिल्या यावेळी राहुल काळे, गोविंद काळे, अशोक वाघमारे, महादेव कांबळे, राजेश गाते, योगेश टोणपे व सर्व जिल्हा परिषद शिक्षकवृंद यावेळी उपस्थित होते.

# वलखेडमध्ये शिक्षक दिन साजरा

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वलखेड येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. ता.५ सप्टेंबर हा दिवस सर्वत्र शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो शिक्षक दिन हा शिक्षकांच्या कौतुकाचा एक विशेष दिवस आहे आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल किंवा सामान्यत समुदाया मध्ये त्यांचा सन्मान करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती चेअध्यक्ष ,लक्ष्मण बिल्हारे.माजी उपसरपंच, विश्वनाथ सुरुंग. आसाराम सुरुंग.माजी तंटामुक्ती अध्यक्ष, गंगाधरराव सुरुंग.सुभाषराव सुरुंग. समाजसेवक, दत्ता अंभुरे.परमेश्वर बिल्हारे.भास्कर पाईकराव. तुळशीदास बिल्हारे.व समस्त ग्रामस्थ वलखेड यांच्या वतीने सर्व शिक्षक मुख्याध्यापक, खवल एस.एस. पाईकराव के एस., इरले व्ही.जी. , वावरे पी. एस. , श्रीमती. तनपुरे ए.एम., श्रीमती. रुद्रे ए. एन. यांचा सत्कार करुण

शिक्षक दिन का साजरा करण्यात आला.

५ सप्टेंबर हा दिवस भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस आहे. ते एक उत्तम शिक्षक होते त्यांनी स्वतःचा जन्मदिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा करावा असे सुचवले म्हणूनच त्यांचा जन्म दिन (जयंती) ही भारतात शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाऊ लागली .

शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अधिक महत्त्व आहे कारण जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरुचा वाटा खूप मोठा असतो.

आम्ही गेल्या तीन वर्षापासुन शिक्षकांचा सत्कार करुन हा शिक्षक दिन साजरा करत असल्याचे शालेय शिक्षण समिती चे अध्यक्ष लक्ष्मण बिल्हारे म्हणाले.



# मानवी आरोग्यास घातक प्रतिबंधित औषधींचा आठ लाखांचा अवैध साठा जप्त

## जालना गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात मानवी आरोग्य घातक असलेले व एनडीपीसी घटक प्रतिबंधीत असलेले गुंगीकारक औषधी व टॅबलेट (गोळ्या) चा मोठा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. Sozox-05.50, Gestapro, Fire-100, Suhagra-100 असा प्रतिबंधीत घटक असलेल्या औषधींचा यात समावेश आहे ही औषधी अवैध गर्भपात व कामवासना उत्तेजीत करणारी असुन जवळपास आठ लाख १८ हजार ४०० किमतीची असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जालना जिल्ह्यात मानवी आरोग्य घातक असलेले व एनडीपीसी घटक प्रतिबंधीत असलेले गुंगीकारक औषधी व टॅबलेट (गोळ्या) विक्री करणारे इसमांची माहिती घेऊन कारवाई करणे बाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जालना यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.

स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना शुक्रवार (दि. ६) रोजी इसम नामे अल्तमश ऊर्फ अलमश शेख निसार शेख रा.शेरसवार नगर जुना जालना हा भोकरदन नाका परिसरात देशी दारु दुकानाच्या पाठीमागे जालना येथे श्रीरिश्रा हा प्रतिबंधीत घटक असलेल्या गोळया विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यावरुन स्था.गु.शा.चे पथकाने पंच व अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी यांचेसह छापा कारवाई करुन अल्तमश शेख याचे ताब्यातुन डुे-०५.५० या कंपनीच्या गोळयांचे ७१२०/- रुपये किंमतीचे पाकीटे जप्त करण्यात आले आहे.

त्यास गोळयांचा पुरवठा करणारे संतोष बालासाहेब जाधव वय २३ वर्षे, व्यवसाय दर्शन मेडीकल लक्कडकोट जालना, रा. वसुंधरानगर जालना, राहुल भागाजी गायकवाड वय ३२ वर्षे, विराज मेडीकल गुरु गणेश भवन जवळ जालना यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांना सदरच्या गोळया उध्दव शिवाजी पटारे वय ४१ वर्षे, रा. सोमनाथ जळगाव ता.जि. जालना ह.मु सनसिटी जालना हा पुरवठा करीत असल्याचे सांगितल्याने, सदर इसमाचा शोध घेतला असता तो त्याचे राहते घरी मिळुन आला आहे. त्याने मानवी आरोग्यास हानिकारक डुे-०५.५० या कंपनीच्या गोळया विनापरवाना विक्री केल्या असल्याचे सांगितले. त्यावरुन सोबतच्या पंचा समक्ष नमुद इसमाचे राहत्या घराची झडती घेतली असता, त्याचे राहते घराचे वरच्या मजल्यावर पलंगाचे बॉक्समध्ये ठेवलेल्या Sozox-05.50, Gestapro, Fire-100, Suhagra-100 असा प्रतिबंधीत घटक असलेल्या तसेच अवैधरित्या गर्भपात व कामवासना उत्तेजीत करणारे गोळयांचा अवैध साठा मिळुन आला आहे.

नमुद आरोपीतांचे ताब्यातुन ८,१८,४००/-रु. किंमतीच्या नशेच्या, गर्भपाताच्या व उत्तेजक गोळयांचे पाकीटे श्रीमती वर्षा महाजन अन्न औषध निरीक्षक, अन्न औषध प्रशासन विभाग जालना यांचे उपस्थितीत जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे १) अल्तमश ऊर्फ अलमश शेख निसार शेख रा.शेरसवार नगर जुना जालना २) संतोष बालासाहेब जाधव वय २३ वर्षे, व्यवसाय दर्शन मेडीकल लक्कडकोट जालना, रा. वसुंधरानगर जालना, ३) राहुल भागाजी गायकवाड वय ३२ वर्षे, विराज मेडीकल गुरु गणेश भवन जवळ जालना ४) उध्दव शिवाजी पटारे वय ४१ वर्षे, रा. सोमनाथ जळगाव ता. जि. जालना ह.मु सनसिटी जालना या इसमांविरुध्द पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदर प्रकरणातील दोषी असलेल्या मेडीकल व्यवसायीक यांचे मेडीकल दुकानांचे परवाने रद्द करण्यासाठी संबधीत विभागास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, यांचे मार्गदर्शनाखाली पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, योगेश उबाळे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस अमंलदार, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, जगदीश बावणे, फुलचंद हजारे, भाऊराव गायके, विजय डिक्कर, रमेश राठोड, प्रशांत लोखंडे, सागर बावीस्कर, इरशाद पटेल, अक्रूर धांडगे, मपोना/ चंद्रकला शडमल्लु, संदीप चिंचोले, किशोर पुंगळे, सचीन राऊत, योगेश सहाणे, सोपान क्षीरसागर, रमेश काळे व चालक गणपत पवार, रमेश पैठणे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.